MERC

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी : ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स : ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल : mercindia@mercindia.org.in वेब-साईट : www.mercindia.org.in


## जाहीर सूचना

प्रकरण क्र. २०१०/३५ दिनांक : ५.१२.२०१०

## विद्युत अधिनियम, २००३ (विअ, २००३) च्या कलम (१५) च्या उप-कलम (५)च्या खंड (ए) खाली नोटीस

१. मेसर्स एन टी एस पॉवर, ५०-ए हडपसर इंडस्ट्रीयल इस्टेट, हडपसर, पुणे-४११०१३ यांनी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात, राज्यांतर्गत विजेचा व्यापार करण्याकरिता परवाना देण्यासाठी अर्ज केला आहे.

२. मेसर्स एन टी एस पॉवर यांनी आयोगाकडे केलेल्या अर्जाची प्रत, त्यासोबतच्या जोडपत्र व परिशिष्टांसह, कोणत्याही व्यक्तीस "**www.navalakhagroup.com**" या वेब-साईटवर किंवा विहित कार्यपध्दतीचे पालन करुन आयोगाच्या कार्यालयात पाहता येईल.

३. उपलब्ध असलेल्या माहितीचा विचार केल्यानंतर, आयोगाचे सकृतदर्शनी समाधान झाले आहे की, एका वर्षात १०० दशलक्ष युनिट्स विजेचा राज्यांतर्गत व्यापार करण्याकरिता परवाना देण्यासाठी अर्जदार अर्हताप्राप्त आहे आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम २००४ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम २००६ ने सुधारित केलेल्या तरतुदींनुसार ए वर्गवारीतील विजेचा व्यापारी म्हणून अर्जदारास राज्यांतर्गत विजेचा व्यापार करण्याकरिता परवाना देण्याचे आयोग प्रस्तावित करीत आहे.

४. संपूर्ण महाराष्ट्र राज्यात, राज्यांतर्गत विजेचा व्यापार करण्याकरिता परवाना देण्याच्या प्रस्तावाच्या संदर्भात, सूचना व हरकती, असल्यास, वरील पत्त्यावर **दि. २८ डिसेंबर, २०१० पर्यंत** मागविण्याकरिता, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम (१५) च्या उप-कलम (५) च्या खंड (ए) खाली, याद्वारे नोटीस देण्यात येत आहे. या तारखेनंतर आलेल्या सूचना व हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. याबाबत, **आयोगाने दिनांक ४ जानेवारी, २०११ रोजी सकाळी ११.०० वाजता**, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५, येथे आयोगाच्या कार्यालयात जाहीर सुनावणी आयोजित केली आहे आणि जी व्यक्ती सूचना किंवा हरकती पाठवेल ती व्यक्ती, इच्छा असल्यास, जाहीर सुनावणीस उपस्थित राहू शकेल; मात्र त्यासाठी कोणताही प्रवास भत्ता/दैनिक भत्ता आयोगाकडून दिला जाणार नाही.

सही/-

**(के.एन.खवारे)**
सचिव, मविनिआ

**मुंबई**
**दिनांक : ५.१२.२०१०**